MHBI160000562026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२६ मधील**
**निशाणी क्र. १ खालील आदेश.**
**रामकवर वि. निरंक**

प्रस्तूतचा अर्ज हा अर्जदार याने बॉम्बे रेग्यूलेशन अधिनियम १८२७ च्या तरतुदी अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार हा अर्जात नमुद पत्यावरील रहिवाशी आहे. मयत रंगुबाई भगवान कुटे ही मौजे हिवरसिंगा, ता. शिरूर कासार येथील रहिवासी होती व ती दिनांक १५/०९/२०२१ रोजी मयत झाली आहे. अर्जदार ही मयत रंगुबाई भगवान कुटे यांची एकुलती एक विवाहीत मुलगी आहे. अर्जदार या व्यतिरिक्त मयत रंगुबाई भगवान कुटे हिस इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे मृत्यु पश्चात अर्जदारास शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी वारस दाखल्याची गरज आहे. करीता, अर्जदाराने ती मयत रंगुबाई भगवान कुटे यांची एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने त्याचे कथनांचे पुष्ठयर्थ निशाणी ०६ वर रंगुबाई भगवान कुटे यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी १४ च्या यादीलगत मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे पती व अर्जदाराचे वडील मयत भगवान दगडु कुटे यांचे मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, हिवरसिंगा येथे नसल्याबाबत ग्रामपंचायत कार्यालय, हिवरसिंगा यांचे अनुउपलब्धता प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी ४ च्या यादीलगत अर्जदार हिचे ओळखपत्र म्हणून तिच्या आधारकार्डची प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदार हिने निशाणी ११ वर तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार हिने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जातील मागणीस अनुसरुन वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

४. अर्जातील कथनास अनुसरुन जाहीरनामा निशाणी ७ काढण्यात आला. त्याचप्रमाणे दिनांक २२/०१/२०२६ रोजी दैनिक सिटीझन या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस निशाणी १० प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदार यास त्याचे मागणी प्रमाणे ती मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे वारस असले बाबत दाखला देणेसंदर्भात हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून अर्जदार हिस तिचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदार याचे मार्फत अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा व त्याबाबत वरील विवेचना वरून असे दिसून येते की, अर्जदार हिने तिचे पुराव्यात मयत रंगुबाई भगवान कुटे हिस ती एकमेव वारस असल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराचे सदरचे कथन कोणीही आव्हानलेले नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा आहे तसा स्वीकारणे क्रमप्राप्त होते. परिणामी, अर्जदाराच्या उपलब्ध पुराव्यावरून अर्जदार ही मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता, अर्जदार ही तिचे मागणीप्रमाणे ती मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार ही मयत रंगुबाई भगवान कुटे यांचे वारस असले बाबतचे वारस प्रमाणपत्र सिव्हील मॅन्युअलचे भाग १४ परिच्छेद क्र.३१२ नुसार योग्य त्या कोर्ट फी रकमेवरती जारी करण्यात यावे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.03.13 11:57:33 +0530

स्थळः– शिरूरकासार.
दि.१२/०३/२०२६

**(अ.सं.जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरूर कासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 12/03/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 12/03/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.03.13 11:58:06 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3